महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक संचालक अधिकाऱ्यांच्या बदली आदेशामध्ये अंशत: बदल करुन सुधारीत पदस्थापना देणेबाबत.

संचालनालय लेखा व कोषागारे महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
30 JUL 2025
प्राप्त झाले सही

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

शासन आदेश क्रमांक:-संलेको-२०२५/प्र.क्र.८६/कोषा. प्रशा.२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-२९/०७/२०२५.

**संदर्भ:-** वित्त विभाग, शासन आदेश, क्रमांक संलेको-२०२५/प्र.क्र.५२/कोषा प्रशा-२ , दि.३०.०५.२०२५.

## शासन आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक संचालक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या संदर्भाधीन आदेशान्वये प्रशासकीय बदल्या करण्यात आल्या आहेत. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दिनांक ११.०२.२०१५ मधील तरतूदीनुसार आणि महाराष्ट्र बदली अधिनियम २००५ मधील कलम ४ (४) व ४ (५) नुसार सदर आदेशातील खालील विवरणपत्रात नमूद केलेल्या अधिकाऱ्यांच्या बदली आदेशात अंशत: बदल करून त्यांना विवरणपत्रातील स्तंभ क्र.४ मध्ये नमुद केलेल्या पदावर सुधारीत पदस्थापना देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | अधिकाऱ्यांचे नाव व पद | संदर्भाधिन आदेश दि.३०.०५.२०२५ अन्वये दिलेली पदस्थापना | अंशत: बदलीने पदस्थापनेचे पद व कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १ | श्री. धर्मराव मनिराम पेंदाम | लेखा परीक्षा अधिकारी, महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित, नागपूर | जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, गडचिरोली |

300

२. वरीलप्रमाणे बदली झालेले अधिकाऱ्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी बदली अधिकाऱ्याची प्रतिक्षा न करता स्थानिक व्यवस्था करुन संबंधित अधिकाऱ्यास तात्काळ कार्यमुक्त करावे.

३. वरीलप्रमाणे बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी बदली झालेल्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. पदस्थानेच्या पदावर रुजू न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४. बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच, संचालक, संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई यांना अवगत करावे.

५. वरील अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांच्या वैयक्तिक माहितीचा तपशील

00989/2025/1503
31.07.2025

HRMS मधील नमून्यात भरून नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत वित्त विभाग तसेच, संचालनालय, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने .

(ता. र. पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर. *
संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई. *
उपसचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, नगर परिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे. *
सहसंचालक, लेखा व कोषागारे, नवी मुंबई/पुणे.
सह सचिव, मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे कार्यालय
संबंधित अधिकारी*
निवडनस्ती कोषा प्रशा-१ व २ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(*संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)